नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०१/२०२५ (शुक्रवार)**

# Evening

---

## अनैर्सगिक लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पोलीस स्टेशन बुटीबोरीः—फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे अप. ९०८/१६ कलम ३७७,५०६ भादंवि सहकलम ६,८,१७,२१ पोक्सो सह कलम ३(२)(v), ३(२)(va) कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील अल्पवयीन फिर्यादी/पिडीत बालक आश्रम शाळेत शिकत होता.यातील फिर्यादी हा त्याचा मुलगा (अल्पवयीन पिडीत बालक) याला भेटायला शाळेत गेला असता त्याने फिर्यादीला सांगितले की चौकीदार **आरोपी क्र १) होमदेव उत्तम पडोळे, वय २५ वर्ष रा. ब्राम्हणी याने त्याचे सोबत अनैसर्गिक संभोग करून त्याचे वर अत्याचार केला आणि त्याला झालेला प्रकार कोणाला सांगितला तर मारण्याची धमकी दिली**.फिर्यादीने शाळेचे मुख्याध्यापक **आरोपी नामे २)अरूण शंकरराव हुसुकले वय ५५ वर्षे रा बोरी** यांना झालेल्या प्रकारा बद्दल सांगीतले असता.मुख्याध्यापकानी तुम्ही घडलेला प्रकार कुणालाही सांगु नका संगीतले तर वाईट होईल अशी धमकी दिली **आरोपी क्र १ आणि २ विरूध्द पोस्टे** बुटीबोरी येथे अप. ९०८/१६ कलम ३७७,५०६ भादंवि सहकलम ६,८,१७,२१ पोक्सो सह कलम ३(२)(v), ३(२)(va) कायद्यान्वये गुन्हा नोंद होता.

सदर प्रकरणाचे तपास उपविभागागिय पोलीस अधिकारी श्री विजयकुमार मराठे आणि पोउपनि सोनाली राठोड यांनी केला उपविभागागिय पोलीस अधिकारी श्री विजयकुमारमराठे यांनी सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा विशेष न्यायालयात दाखल केले होते. आज दिंनाक ३१/०१/२०२५ रोजी मा.जिल्हा सत्र न्यायधीश १२ श्री जहिर अब्बास शेख यांनी वरील नमुद **आरोपी क्र १) होमदेव उत्तम पडोळे, वय २५ वर्ष रा. ब्राम्हणी यास** कलम ४ पोक्सो मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रू दंड. दंड न भरल्यास २ महिने साधी कैद , कलम ६ पोक्सो मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रू दंड. दंड न भरल्यास २ महिने साधी कैद , कलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास २ महिने साधी कैद , कलम ३७७ भादवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रू दंड. दंड न भरल्यास २ महिने साधी कैद , कलम ५०६ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड न भरल्यास २ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. आरोपी क्र **२)अरूण शंकरराव हुसुकले वय ५५ वर्षे रा बोरी यास** कलम २१ पोक्सो मध्ये ६ महीने साधी कैद, व १००००/— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद

सरकारचे वतीने ए.पी.पी. रशमी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सहायक फौजदार अनिल व्यवहारे पो.स्टे. बुटीबोरी यांनी मदत केली आहे.

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी/अंमलदार १. पोउपनि देवेंद्र अर्जुन गणवीर नेमणूक जिल्हा विशेष शाखा नागपूर ग्रामीण,२. सहायक फौजदार प्रकाश हरीषचंद गेडाम नेमणूक पोलीस स्टेशन अरोली, ३. सहायक फौजदार विजयनारायण राममुर्ती पाण्डेय, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण ४. दप्तरी श्रीमती मंगला अशोक मसराम ,अपर पोलीस अधिक्षक कार्यालय यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण ,श्री विजय माहुलकर, पोलीस उपअधिक्षक गृह,श्री वैभव जाधव ,पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, श्री प्रमोद घोंगे ,पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा,श्री अजय मानकर ,पोलीस निरीक्षक मानव संसाधन शाखा हे हजर होते.







